**अर्ज निशाणी क्रमांक ८५ वर आदेश**
(पारीत केलेला दिनांक **१८.०७.२०२३**)

०१. प्रस्तूत अर्ज वादीने वादपत्रावर दिनांक **३०.०६.२०२३** रोजीचा "**वादीचा पुरावा बंद केल्याचा**" आदेश रद्द करण्यासाठी दाखल केला आहे.

०२. प्रस्तूत अर्जावर प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे दाखल करुन कथन केले की, वादीतर्फे तीन अर्ज दिले होते. परंतू वादीने जाणुन–बुजून वेळेत पुरावा दिला नाही. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

०३. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला.

०४. वादींनी त्यांच्या नावाचा पुकारा झाला त्यावेळेस त्यांच्या साक्षीदारांचे शपथपत्राचे टंकलेखन चालू असल्यामुळे हजर राहून पुढील पुरावा देऊ शकले नाही असे कारण नमूद केले आहे. वादींनी त्याच दिवशी दुसऱ्या सत्रात पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे. म्हणून वादपत्रावरील दिनांक **३०.०६.२०२३** रोजी "**वादीचा पुरावा बंद करण्याचा**" झालेला आदेश रद्द करणे उचित आहे. म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

१. अर्ज **नि.क्र.८५** मंजूर करण्यात येतो.
२. वादपत्रावर "**वादीचा पुरावा बंद करण्याचा**" झालेला आदेश विनाखर्च रद्द करण्यात येतो.

Digitally signed by SUBHASH LAXMAN PHULE
Date: 2023.07.18 17:29:30 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

**(श्री. सुभाष ल. फुले.)**

**दिनांक :– १८.०७.२०२३. सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, औसा.**
**ठिकाण :– औसा. जिल्हा लातूर.**